REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १४ एप्रिल १९४८ अंक १४

विजय
टेक्स्टाइल्स लि.
—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगिण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

दि सुप्रीम म्यूच्युअल
विमा कंपनी लि. पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठी व विम्यासाठी चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक आंबावडी फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

नं. २० साबण बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड (जि. सातारा)

## विविध माहिती

**प्राध्यापकाचा बिगर-तिकिट प्रवास**—सुप्रसिद्ध इंग्लिश तत्त्वज्ञानी प्रो. जोड ह्यांच्यावर, रेल्वेनें विनातिकिट प्रवास केल्याबद्दल खटला चालू आहे. आपण तिकिट न काढतां प्रवास कां करीत होतों, ह्याबद्दल प्रोफेसरांनीं निरनिराळीं कारणें सांगितल्यामुळें त्यांचा कबुलीजबाब न स्वीकारतां खटला पुढें चालविण्याचा हुकूम कोर्टानें दिला आहे.

**हिंदी कापडाची परदेशी निर्यात**—हिंदुस्थान सरकारनें १९४८ सालाच्या पहिल्या सहामाहींत परदेशीं पाठविण्यांत येणाऱ्या हिंदी कापडाविषयीं कांहीं प्रमाण निश्चित केलें आहे. एकंदर २१ कोटी वार कापड निर्यात व्हावयाचें असून त्यापैकीं ७ कोटी, ७० लाख वार कापड अमेरिकेला जावयाचें आहे. उरलेल्या १ कोटी, ३३ लाख वार कापडापैकीं ७५ टक्के माल जुन्या गिऱ्हाइकांना देण्यांत येणार असून बाकीचा २५ टक्के नव्या गिऱ्हाइकांत वाटण्यांत येईल.

**टेलिफोनचा कारखाना**—हिंदुस्थान सरकारचे वाहतूक खात्याचे चिटणीस श्री. मेनन आणि मुंबईच्या टेलिफोन कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. नटराजन् हे नुकतेच बर्न ( स्वित्झरलंड ) ला रवाना झाले. हिंदुस्थानांत टेलिफोन तयार करण्यासाठीं जरूर असलेली यंत्रसामुग्री मिळविण्यासाठीं ते प्रयत्न करणार आहेत, असें समजतें.

**कापडाच्या धंद्यांत जपानची पुन्हा स्पर्धा**—येत्या दहा वर्षांत जपानी कापडाची स्पर्धा ब्रिटिश व अमेरिकन गिरणीवाल्यांना जाणवूं लागेल, असा इषारा ब्रिटनच्या कॉटन बोर्डाचे अध्यक्ष सर रेमंड स्ट्रीट ह्यांनीं दिला आहे. ही स्पर्धा जपानमधील कापडाची निर्मिती व त्याच्या किंमती ह्या दोन्ही दृष्टींनीं महत्त्वाची ठरेल, असेंही ते म्हणाले.

**लष्करांतून निवृत्त झालेल्यांना नोकऱ्या**—फेब्रुआरी, १९४८ अखेरपर्यंत लष्करांतून निवृत्त झालेल्या लोकांपैकीं ३ लाख लोकांना नोकऱ्या देण्यांत आल्या. हिंदुस्थानांतील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्यें नांवें नोंदलेल्या एकूण लोकांशीं वरील संख्या २२ टक्के पडते. मद्रास प्रांतांतील २,४४,००० नांवें नोंदविलेल्या लोकांपैकीं ६४,३०० लोकांना कामधंदा लावून देण्यांत आला.

**तांत्रिक शिक्षण संस्थांना मदत**—ऑल इंडिआ कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन ह्या संस्थेची बैठक गेल्या नोव्हेंबरमध्यें दिल्लीस भरली होती. त्यावेळीं देशांतील तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांना तीन ते पांच वर्षेपर्यंत मदत देण्यांत यावी असें संस्थेनें सुचविलें होतें. संस्थेच्या शिफारसीला अनुसरून भांडवली स्वरूपाची १ कोटी, ५० लक्ष रुपयांची व दर वर्षीं लागणाऱ्या स्वरूपाची ३० लक्ष रुपयांची मदत अशा संस्थांना देण्याचें सरकारनें मान्य केलें आहे.

**हिंदी निर्यात व्यापार**—१९४८ च्या पहिल्या दोन महिन्यांत हिंदुस्थानचा निर्यात व्यापार ४६ व ४७ सालापेक्षां बराच वाढला आहे. १९४७ सालापेक्षां गळिताचीं धान्यें ८ पट अधिक निर्यात झालीं. त्याचप्रमाणें एरंडेल तेल व अळशीचें तेलही अधिक प्रमाणांत निर्यात झालें आहे. तागाच्या वस्तू १९४६ पेक्षां ३० टक्के अधिक व १९४७ पेक्षां १५ टक्के अधिक निर्यात झाल्या. हिंदुस्थानचा **निर्यात व्यापार अधिक वाढावा म्हणून कांहीं पदार्थांच्या निर्यातीवरील नियंत्रणें रद्द करण्याचा व निर्यातीचे परवाने अधिक सढळ हातानें देण्याचा सरकारचा विचार आहे, असें समजतें.**


## दि बँक ऑफ कराड, लि.

कराड ( जि. सातारा )

( स्थापना : १२-३-१९४६ )

### पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल | .... | १,२५,००० रु. |
| ठेवी | .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल | .... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर

## मुदलियार अँड मुदलियार

### बिझिनेस व सेलस ऑर्गनायझर्स

११५४ शंकरशेट रोड, पुणें २.

आम्ही कोणत्याही मालाचा उठाव तूर्त महाराष्ट्र आणि कर्नाटक करितां गॅरंटीनें करून देऊं. सध्यां डॉ. गोंवडे ज्वरबिंदू डेपो व मॉर लॅबोरेटरीज यांचें काम आम्ही हातीं घेत आहोंत. चलाख व होतकरू तरुणांना आम्ही कॅनव्हसिंगचें शिक्षण देऊन तयार करणार आहोंत.






# अर्थ

बुधवार, ता. १४ एप्रिल १९४८




प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी संघराज्याचें औद्योगिक धोरण

हिंदी संघराज्याचे उद्योग आणि पुरवठा-मंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी ह्यांनीं सरकारच्या उद्योगविषयक धोरणासंबंधीं दिशा दाखविणारा ठराव नुकताच हिंदी पार्लमेंटपुढें मांडला. हिंदी अर्थ-व्यवस्थेचें नियोजन करण्यासाठी एक राष्ट्रीय नियोजन समिती नेमण्याचा सरकारचा विचार ह्या ठरावांत व्यक्त करण्यांत आलेला आहे. नियोजन समिती नेमण्यांत सरकारचा मुख्य उद्देश पुढील प्रमाणें सांगण्यांत आला आहे. ( १ ) हल्लींपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर शिक्षणाच्या व आरोग्याच्या साधनांचा प्रसार करणें, ( २ ) देशांतील सुप्त साधनांचा उपयोग करून, उत्पादन वाढवून, लोकांचें रहाणीचें मान झपाट्यानें वाढविणें आणि ( ३ ) समाजाची सेवा करण्याची संधि प्रत्येक व्यक्तीला समानतेच्या तत्त्वानें मिळवून देणें. आर्थिक नियोजन समितीचें जें ध्येय वरीलप्रमाणें ठरविण्यांत आलें आहे, त्यांत उद्योगधंद्यांचा कार्यभाग कोणता हा प्रश्न महत्त्वाचा असून त्यासंबंधींचें सरकारचें धोरणही ठरावांत दिग्दर्शित करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील बहुजन समाजाच्या रहाणीचें मान वाढण्यासाठी प्रथमतः औद्योगिक व शेतकीचें उत्पादन ह्यांची वाढ होणें अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या योग्य वाटणीचा प्रश्न नंतरचा आहे. त्यांतल्या त्यांत भांडवली स्वरूपाचा औद्योगिक माल हिंदुस्थानांतच तयार करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण, तो उत्पन्न झाल्यावर मूलभूत उद्योगधंदे निर्माण करणें शक्य होऊन जीवनावश्यक रोजच्या वस्तूंचें उत्पादन सुलभतेनें करतां येईल.

सद्यःपरिस्थितींत सरकारला सर्वच उद्योग-धंद्यांवर ताबा चालविणें शक्य नसलें तरी हळुहळु एकंदर अर्थव्यवस्थेंत सरकारला अधिकाधिक हस्तक्षेप करावा लागेल, हें उघड आहे. ह्या दृष्टीनें सरकारनें पुढील उद्योगधंदे पूर्णपणें आपल्या नियंत्रणाखालीं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ( १ ) शस्त्रास्त्रें व दारूगोळा तयार करण्याचे कारखाने, ( २ ) उद्योगधंद्यांना लागणाऱ्या प्रेरणाशक्तिचें उत्पादन व नियंत्रण, ( ३ ) रेल्वेची वहातूक. ह्याशिवाय देशाच्या रक्षणासाठीं जरूर वाटली तर कोणताहि धंदा ताब्यांत घेण्याचा अधिकार सरकार आपणाकडे राखून ठेवणार आहे. पुढील प्रकारच्या उद्योगधंद्यांचे नवे कारखाने काढण्याचा हक्क मध्यवर्ती, प्रांतिक अगर संस्थानांचीं सरकारें ह्यांच्यासाठी राखून ठेवण्यांत येईल. म्युनिसिपल कॉर्पोरेशनलाही वरील अधिकार राहील. सरकारला जरूर वाटली, तर योग्य तीं नियंत्रणें घालून खाजगी उद्योगधंद्यांची मदत व सहकार्य घेता येईल. हे उद्योगधंदे असे:— ( १ ) कोळशाच्या खाणी, ( २ ) लोखंड व पोलादाचे कारखाने, ( ३ ) विमानांचे कारखाने, ( ४ ) जहाज बांधण्याचे कारखाने, ( ५ ) टेलिफोन, टेलिग्राफ व बिनतारी संदेशवाहकांची सामग्री आणि ( ६ ) खनिज तेलें. ह्या उद्योगधंद्यांपैकीं कोठलाही चालू धंदा लोकहिताच्या दृष्टीनें ताब्यांत घेण्याचा सरकारचा हक्क अबाधितच रहाणार आहे. तथापि ह्या क्षेत्रांतील चालू धंद्यांना दहा वर्षेपर्यंत सरकार हात लावणार नाहीं. उलट, त्यांना आपली कार्यक्षमता वाढविण्यासाठीं आणि विस्तार करण्यासाठीं सर्व सवलती देण्यांत येतील. दहा वर्षांनंतर एकंदर परिस्थितीचा साकल्यानें विचार करून निर्णय ठरविण्यांत येईल. एखादा धंदा सरकारनें आपल्या मालकीचा करावा असें सरकारला त्यावेळीं वाटलें, तर योग्य ती नुकसानभरपाई देऊनच सरकार तो धंदा ताब्यांत घेईल.

सरकारनें काढलेल्या उद्योगधंद्यांचें चालकत्व सरकारच्या कायदेशीर नियंत्रणाखालीं असलेल्या पब्लिक कॉर्पोरेशनकडे सोपविण्यांत येईल. विजेच्या निर्मितीसंबंधीं सरकारनें अशा प्रकारचा एक कायदा जाहीर केलेलाच आहे. कांहीं मूलभूत उद्योगधंदे असे आहेत कीं, त्यांच्यावर सरकारचें नियंत्रण असणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मीठ, मोटारी व यांत्रिक नांगर, इलेक्ट्रिक एंजिनिअरिंग, जड यंत्रसामुग्री, सीमेंट, साखर, कागदाच्या व कापडाच्या गिरण्या. अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. तथापि, असें नियंत्रण ठेवण्यासंबंधीं प्रांतांचीं व संस्थानांचीं सरकारें, त्याचप्रमाणें मजुरांचे प्रतिनिधी ह्यांचा सल्ला जरूर घेतला जाईल. मोठ्या उद्योगधंद्यांची व छोट्या ग्रामोद्योगांची स्पर्धा न लागता त्यांचे उत्पादन एकमेकांना पूरक कसें करतां येईल यासंबंधीं विचार होणें जरूर आहे. त्या दृष्टीनें योग्य योजना करण्याची तरतूद सरकार करीत आहे. देशाच्या उत्पादनांत वाढ व्हावयाची तर मजूर आणि मालक ह्यांच्यांत सहकार्य असणें अत्यंत आवश्यक आहे. गेल्या डिसेंबर महिन्यांत दिल्लीला भरलेल्या औद्योगिक परिषदेंत झालेला ठराव ह्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. तो ठराव अंमलांत आणण्यासाठीं सरकार एक खास अधिकारी नेमीत आहे. परकीय भांडवल हिंदी उद्योगधंद्यांत घेतलें तर देशाचें औद्योगीकरण झपाट्यानें होईल हें खरें; तथापि परकीय भांडवलाला थारा देतांना कोठल्याही उद्योगधंद्यांची नियामक सत्ता परकीय भांडवलाच्या हातीं जाता कामा नये, अशी दक्षता सरकार घेईल. त्याचप्रमाणें, परकीय तज्ज्ञांकडून हिंदी तज्ज्ञ तयार करवून घेण्याची अटही परकीय तज्ज्ञांना नौकरीवर घेतांना सरकार घालील.

---

**दंगल पीडितांना मदत**—दक्षिण महाराष्ट्रांतील दंग्यांत नुकसान झालेल्या कुटुंबांना मदत करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ही मदत दोन प्रकारानें देण्यांत येईल. एखाद्या कुटुंबांतील मिळवता माणूस दगावला असला अगर त्या कुटुंबाची मालमत्ता नष्ट झाली असेल तर २ हजार रुपयांपर्यंत ( परतफेड करावी न लागणारी ) रक्कम देण्यांत येईल. मात्र अर्जदाराला दुसरीकडून कोठूनही मदत मिळण्यासारखी नाही अशी सरकारची खात्री झाली पाहिजे. मदतीचा दुसरा प्रकार म्हणजे दंगल पीडितांना आपला पुन्हा जम बसविण्यासाठीं जास्तींत जास्त २५ हजार रुपयांचें कर्ज देण्यांत येईल. अर्जावर पहिल्या वर्षी व्याज आकारलें जाणार नाहीं, नंतर ३½ टक्के व्याज आकारलें जाईल. कर्ज ७ वर्षे अगर १० वर्षे ह्या मुदतींत फेडावीं लागतील. ज्यांना तारण म्हणून स्थावर मिळकत देतां येईल त्यांच्याकडून गहाणपत्रें करून घेतलीं जातील. ज्यांच्याजवळ अशी मालमत्ता नसेल त्यांना जामिनकीवर कर्जे दिलीं जातील. स्टॅंप व नोंदणीचा आकार माफ केला जाईल.

ताजे उपलब्ध आकडे

## हिंदी विमा व्यवसाय

### १९४६ मधील हिंदुस्थानांतील आयुर्विम्याचें काम

| | एकूण पॉलिसी | विम्याची रकम | वार्षिक हप्ते | प्रत्येक पॉलिसीची सरासरी |
|---|---|---|---|---|
| | | ( आकडे लक्ष रुपयांचे ) | | रकम ( रु. ) |
| हिंदी कंपन्या | ५,९६,००० | १,३१,४३ | ७,२१ | २,२०५ |
| विदेशी कंपन्या | २१,००० | १२,८४ | ७३ | ६,११४ |
| एकूण | ६,१७,००० | १,४४,२७ | ७,९४ | — |

१९४५ चे मानानें १९४६ साली ८ कोटी, ८९ लक्ष रुपयांचे १८,००० विमे अधिक उतरण्यांत आले आहेत आणि त्यामुळ वार्षिक हत्प्यांच्या रकमेंत ४७ लक्ष रुपयांची वाढ झाली आहे.

### १९४६ अखेरचें चालू काम

| | एकूण पॉलिसी | विम्याची रकम | वार्षिक हप्ते |
|---|---|---|---|
| | | ( आकडे लक्ष रुपयांचे ) | |
| हिंदी कंपन्या | २५,६९,००० | ५,१४,५० | २५,६९ |
| विदेशी कंपन्या | २,२८,००० | १,००,८५ | ५,६५ |
| | २७,९७,००० | ६,१५,२५ | ३१,२४ |

### लाइफ फंड

हिंदी विमा कंपन्यांच्या लाइफ फंडांत १५ कोटी, ८५ लक्ष रुपयांची वाढ झाली; विदेशी कंपन्यांनीं आपल्या लाइफ फंडांत १ कोटी, ८८ लक्ष रुपयांची भर टाकली.

### हिंदी विमा कंपन्यांच्या जिंदगीची गुंतवणूक

| | रकम ( लक्ष रु. ) |
|---|---|
| हिंदी सरकारचे रोखे | ९२,८५ |
| हिंदी संस्थानी रोखे | ९७ |
| ब्रिटिश व परकी रोखे | १,३२ |
| म्युनिसिपल, पोर्टट्रस्ट, इं. ट्रस्ट रोखे | ७,५८ |
| मालमत्तेचें गहाण | १,६५ |
| पॉलिसीवर कर्जें | ६,०९ |
| स्टॉक-शेअर्सवर कर्जें | ४४ |
| इतर कर्जें | ६९ |
| हिंदी कंपन्याचे शेअर्स | १५,३३ |
| जमीन, घरें | ५,३९ |
| एजंटाकडे बाकी, येणें हप्ते, येणें व्याज | ७,९७ |
| ठेवी, रोख, स्टँप्स | ८,७८ |
| इतर | २,०३ |
| एकूण | १,५१,०९ |

### व्यवस्था खर्च व लाइफ फंडावरील व्याज

| वर्ष | व्यवस्था खर्च (%) | व्याजाचा दर ( % ) |
|---|---|---|
| १९४२ | २६·७ | ३·९४ |
| १९४३ | २७·९ | ३·८८ |
| १९४४ | ३१·२ | ३·६४ |
| १९४५ | ३२·२ | ३·४८ |
| १९४६ | ३१·२ | ३·२० |

### एजंटांचे लायसेन्स

| वर्ष | नवे लायसेन्स | रिन्युअल | एकूण |
|---|---|---|---|
| १९४३ | – | – | ६५,९२१ |
| १९४४ | ४६,४२५ | ४३,४७७ | ८९,९०२ |
| १९४५ | ६६,५५३ | ५६,३७३ | १,२२,९२६ |
| १९४६ | ८२,५२० | ७४,४७२ | १,५६,९९२ |

वरील एकूण १,५६,९९२ एजंटांपैकी २१,७०० म्हणजे १४% स्त्रिया आहेत, हें कित्येकांस आश्चर्यकारक वाटेल. ह्या २१,७०० पैकी बऱ्याचशा एजंट नांवापुरत्याच असणार, हें उघड आहे.

### एकत्रित आढावा

१९४६ सालअखेर हिंदी विमा कंपन्यांच्या २५,६९,००० पॉलिसी चालू होत्या. ह्या विमापत्रकांची दर्शनी जोखीम ५१४ कोटी, ५० लक्ष रुपये होती; ह्या विमापत्रकांचें हप्त्यांचें उत्पन्न २५ कोटी, ५९ लाख रुपये होतें. १९४५ सालापेक्षा विमापत्रकांची संख्या १,९३,००० नी अधिक झाली. दर्शनी जोखीम ५५ कोटी, ७ लक्ष रु. नीं वाढली व हप्त्यांचें उत्पन्न २ कोटी, ७८ लाखांनीं वाढलें. परदेशी कंपन्यांनीं दिलेलीं विमापत्रकें २,२८,००० असून त्यांची दर्शनी जोखीम १०० कोटी, ८५ लाख रु. होती. हप्त्यांचें उत्पन्न ५ कोटी, ६५ लाख रु. होतें. १९४३ सालांतील हिंदी आयुर्विमा कंपन्यांचें एकूण उत्पन्न ३२ कोटी, २ लाख रुपये आणि परदेशी विमा कंपन्यांचें ७ कोटी, ७६ लाख रुपये होतें. हिंदी विमाकंपन्यांनीं १९४६ साली विमानिधींत १५ कोटी ८५ लाखांची भर घातली. परदेशी कंपन्यांनीं १ कोटी, ८८ लाखांची भर घातली.

---

### भोर स्टेट बँक लि., भोर

वरील बँकेस तिच्या व्यवहारांत १९४७ मध्यें १२,२१५ रु. नफा झाला. गंगाजळींत ३,००० रु. टाकण्यांत आले व ४% डिव्हिडंड देण्यास ५,००० रु. लागले. नोकरवर्गासाठीं तरतूद म्हणून १,००० रुपयांचा विनियोग करण्यांत आला आणि बाकीची रकम पुढील वर्षाचे नफ्यामध्यें मिळविण्यासाठीं शिलक ठेवण्यांत आली. बँकेला कर्जरोख्यांच्या खरेदी-विक्रींत ७,२८१ रु. जमेकडे मिळाले, परंतु अहवालाचे दिवशीं बँकेजवळील कर्ज-रोख्यांत जो घसारा दिसला तो भरून काढण्याकडे ह्या रकमेचा विनियोग करण्यांत आला. एकंदर १०,२४३ रु. घसाऱ्याइतकी रकम इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन रिझर्व्ह म्हणून निराळी काढली आहे. अहवालाचे वर्षी बँकेची एक शाखा शिरवळ येथें उघडण्यांत आली. अहवलाचे वर्षी नोकरवर्गाकरितां प्रॉव्हिडंड फंडाची योजना सुरू करण्यांत आली. अहवालाचे वर्षांत, बँकेच्या स्थापनेपासून असलेले मॅनेजर श्री. श्री. वा. काळे, हे परत बँक ऑफ महाराष्ट्र-मध्यें गेले. बँकेच्या प्रगतीस त्यांची बहुमोल मदत झाली, तिचा उल्लेख डायरेक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत केला आहे. भोर स्टेट बँक आपलें वसूल भांडवल १½ लक्ष रुपयांचें २½ लक्ष रुपये करण्याच्या विचारांत आहे आणि पुणें येथें शाखा काढण्याचाहि तिचा संकल्प आहे, असें समजतें. श्री. रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑनर्स ) हे बँकेचे मॅनेजर असून बँकेच्या हल्ली पाली व शिरवळ येथें शाखा आहेत. बँकेचा ताळेबंद १७ लक्ष, ६८ हजार रुपयांचा आहे.

---

### अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत वाढ

१९४७ मधील अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकडा २०२१ कोटी डॉलर्स एवढा मोठा आहे. आयात-निर्गत दोन्हींत वाढ झाली आहे. निर्गतींत ४९% वाढ झाली व आयात १७% वाढली.

## हिंदी औद्योगिक भांडवलविषयक विचार

लेखक : श्री. वसंत विष्णु लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें

पंधरा ऑगस्ट एकोणिसशें सत्तेचाळीसपर्यंत हिंदी उद्योगधंद्यांस ब्रिटिश राजकर्त्यांकडून कधींच प्रोत्साहन मिळालें नाहीं. आर्थिक व्यवस्था अनिर्बंध असावी या तत्त्वाचा पगडा आणि ब्रिटनच्या कारखानदारीला येथें पूर्णपणें वाव या दोन गोष्टींवर राजकर्त्यांची नजर असल्याकारणानें हिंदी व्यवसायांस आपण होऊन कोठलीहि मदत करण्याचा या राजकर्त्यांना विचार सुचत नव्हता. चौदा सालचें व एकोणिसशें चाळीस सालचें अशीं दोन मोठीं युद्धें ब्रिटननें मारलीं. या युद्धांत जर औद्योगिक पूर्णावस्थेला गेलेला हिंदुस्थान ब्रिटनच्या बाजूनें मनापासून लढला असता तर लढायांचे निकाल चुटकीसरसे लागले गेले असते. पण जर हिंदुस्थान स्वावलंबी बनूं दिला तर ब्रिटनची कारखानदारी कायमची बसण्याची भीति असल्यानें हिंदी धंद्यांना प्रोत्साहन अथवा चालना देण्याची हिंदुस्थानच्या ब्रिटिशांचे अेजंट असलेल्या सरकारला गरज वाटत नव्हती. दोन्हीं युद्धांत लढाईला जुजबी माल पुरवतां यावा एवढ्यापुरतीच मदत हें सरकार करीत आलें; आणि आमच्या उद्योगधंद्यांनीं जी काय प्रगति केली ती केवळ स्वतःच्या अपुऱ्या भांडवलावर व बुद्धिमत्तेच्या जोरावर परकीय बलिष्ठ प्रतिस्पर्ध्यांशीं झगडून केली.

इकडील उद्योगपतींना नांवाजतांना एका महत्त्वाच्या घटनेला विसरून चालणार नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या अनिर्बंधतेच्या धोरणाच्या छायेंत इकडेहि पाश्चिमात्य राष्ट्रांप्रमाणें भांडवलशाही प्रस्थापित झालेली आहे व त्यामुळें एकूण भांडवली व्यवस्थेमुळें उद्भवणाऱ्या दुष्परिणामांना येथेंहि टाळतां आलेलें नाहीं. स्वतंत्र हिंदुस्थान सरकारला यापुढें देशांतील कारखानदारीला जोराची चालना देणें व त्याबरोबरच भांडवलशाहीचे दुष्परिणाम निपटून काढून उत्पादन घटूं न देतां मजूर-कामकऱ्यांचें हितसंवर्धन साधणें, अशा तऱ्हेचें धोरण आखणें जरूर आहे.

### भांडवलाचा पुरवठा

भांडवलाचा उगम सामाजिक बचतींतून होत असतो. देशांतल्या वार्षिक उत्पन्नाचा जितका जास्तींत जास्त भाग शिल्लक टाकतां येईल तितका उद्योग-व्यवसायास भांडवलाचा जास्त पुरवठा होऊं शकेल. हिंदुस्थानच्या निसर्गसाधनांच्या व लोकसंख्येच्या मानानें उत्पादन फारच कमी आहे हें नव्यानें सांगावयाची जरूरी नाहीं. उत्पादनामुळें बचतीलाहि फारसा वाव रहात नाहीं. इतिहासकालांत जी सामाजिक बचत होत आली ती नव्या भांडवलाच्या उत्पादनाकडे न फिरतां सोन्यांत सांठवली जाऊन जमिनीखालीं गडप झाली यामुळें आमच्या उद्योगधंद्यांना गुंतवणुकीचें जीवन योग्य तऱ्हेनें लाभलें नाहीं. ही सोन्यांतली गुंतवण जर देशांत प्रथमपासून सुवर्ण परिमाण राहिलें असतें व देशांत सुसूत्र बँकिंग अस्तित्वांत असतें तर ती बाहेर पडून भांडवलाचा पुरवठा वाढला असता. आज देशांत हें सांठविलेलें सोनेंहि शिल्लक नाहीं. कारण १९३०–४० च्या जागतिक मंदींत दैनंदिन हलाखीमुळें तें बाहेर विकलें गेलेलें आहे.

### स्टर्लिंग गंगाजळी

भविष्यकालीन औद्योगिक प्रगतीला जसें वर्तमानकाळांतील बचतीला महत्त्व आहे तसेंच चालू काळांतही प्रगति होत राहण्याला भूतकाळांतील बचतीकडे पाहावें लागेल. इतिहासकालांतील बचत आज खलास झालेली आहे हें वर सांगितलेंच आहे पण १९३९ ते १९४५ हा अलिकडील भूतकाळाचा एक नवा कालखंड कल्पिला तर या कालखंडांत हिंद देशाला अनिच्छतया बचत करणें भाग पडलेलें आहे असें दिसून येईल. मागील शतकांत झाली नसेल एवढी बचत करून या सहा वर्षांत हिंदुस्थाननें स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन ब्रिटनला दुसरी लढाई जिंकण्यास मदत केलेली आहे. या मदतीचें गमक म्हणजे युद्धसमाप्तीच्या सुमारास हिंदुस्थाननें इंग्लंडचें राष्ट्रीय देणें फेडून शिल्लक राहिलेली स्टर्लिंग गंगाजळी ही आज हिंदुस्थान–पाकिस्तान मिळून अकराशें दशलक्ष पौंड स्टर्लिंग म्हणजे सुमारें चौदाशें कोट रुपयांवर आहे.

चालू काळांतील औद्योगिक प्रगतीकरितां इतर परिस्थिति अनुकूल आहे हें सध्यां गृहीत धरून या स्टर्लिंग ठेवीचा आपल्या उद्योग-धंद्यांना कितपत फायदा होण्यासारखा आहे हें पाहिलें तर निराशाच पदरीं पडेल. ब्रिटनला युद्धोत्तर हलाखीमुळें जगणेंहि कठिण होऊन बसलें असून चालू खर्चाकरितांच अमेरिकेकडून अफाट कर्ज काढावें लागत आहे. तेव्हा या ठेवींपोटीं आपणाला ब्रिटनकडून आवश्यक यंत्रसामुग्री मिळेल अशी आशा करणें व्यर्थ आहे. ब्रिटनच्या नांवावर अमेरिकेकडून उत्पादनासामग्री मिळणें हेंहि इंग्लंडच्या अमेरिकेंतील ऋणत्वामुळें शक्य नाहीं. अितकेंच नव्हें, तर आज ब्रिटन कर्जांत मोठी सूट मिळावी याकरितां धडपडत आहे. तेव्हा स्टर्लिंग ठेवीवर आजच्या औद्योगिक प्रगतीकरितां विसंबून बसणें फसगतीचें धोरण ठरेल. याचा दुसरा अर्थ असा कीं, मागील सहा वर्षांची आपली बचत जवळ जवळ फोल झालेली आहे.

### अंदाजपत्रक आणि कर्जउभारणी

याचा निष्कर्ष अर्थात् असाच निघतो कीं, आजच्या व भविष्यकालीन औद्योगिक प्रगतिकरिता हिंदुस्थानाला स्वतःवरच अवलंबून राहिलें पाहिजे. स्वतंत्र हिंदी सरकारचें प्रथम कर्तव्य देशांतील कानाकोपऱ्यांतील बचतीचे ओढे-ओहोळ अेकत्रित आणणें हें ठरतें. त्याबरोबर गुंतविणारास गुंतवणुकीकरितां लागणारें विश्वासाचें वातावरण निर्माण करणें जरूर आहे. १९४७ चें अंदाज पत्रक या दृष्टीनें अत्यंत घातकी ठरलें. पाकिस्तान विभक्त झाल्यानंतर १९४८ चें श्री. चेट्टी यांचें अंदाजपत्रक यापेक्षा पुष्कळच विश्वास सांवरणारें म्हणावयास हवें. कोठल्याहि विशिष्ट आर्थिक प्रमेयाचा अट्टाहास न करतां श्री. चेट्टी यांनीं सुवर्णमध्य साधला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीमंतांना बचतीस अधिक मोकळीक देण्यांत आलेली आहे, त्याबरोबरच दौलतीवरील कराच्या कायद्याचें सूतऊवाच करून राष्ट्रनिर्धीकरितां देशांतील संपत्तीच्या विषम वांटणीवर प्रहार करणारा एक नवा मार्ग खुला करून ठेवला आहे.

श्रीमंतांच्या बचतीवर प्रत्यक्ष परिणाम घडविणारे मध्यवर्ती अंदाज पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर गरीब व मध्यमवर्गांच्या शिलका एकत्रित आणण्याच्या दृष्टीनें सरकारनें प्रयत्न चालविलेले दिसतात. नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट्स व वार्षिक कर्जउभारणी या रूपानें बचतीचा ओघ सरकार आपणाकडे ओढून घेत आहे. आपणाकडे जनतेचा पैसा या रूपानें खेंचून घेण्यांत सरकारला चलनविकासाला थोडा-बहुत आळा घालतां येतो, व स्वतःची रोजच्या खर्चाची तजवीज साधतां येते पण उद्योगधंद्यांना या सरकारी कर्जाचा काडीइतकाहि प्रत्यक्ष फायदा मिळत नाहीं. उलट, खुल्या नाणें बाजारांत उद्योगधंद्यांकरितां कर्ज काढण्यास येणाऱ्या औद्योगिक संस्थांना सरकारची प्रतिस्पर्धा मात्र होते. सरकारी कागदावर जनतेचा जास्त विश्वास असल्यामुळें सरकारला कमी व्याजांत कर्ज मिळतें. उद्योगधंद्यांना अपुरें कर्ज चढत्या दरानें घ्यावें लागतें. जोंपर्यंत युद्धजन्य चलन-विकास जोरांत चालू होता तोंपर्यंत नव्या औद्योगिक संस्था स्थापन होण्यास फारशी अडचण पडली नाहीं; पण हिंदुस्थानच्या मागील दोन वर्षांच्या राजकीय दुष्ट परिस्थितीमुळें

पैशाची फिरत कमी होऊन आतां या संस्थांना अडचण भासूं लागून उत्तरोत्तर चढतें व्याज द्यावें लागत आहे.

**नव्या संस्थांची जरूरी**

तेव्हा उद्योगधंद्यांना प्रत्यक्ष मदत देण्याकरिता वेगळे मार्ग काढणें जरूर आहे. त्यापैकीं महत्त्वाचा एक म्हणजे सरकारनें स्वतःच औद्योगिक भांडवल पुरविणारी सरकारी संस्था काढणें. नुकतीच दहा कोट भांडवलाची एक सरकारनियंत्रित संस्था कायद्यानें प्रस्थापित करण्यांत आली आहे, ती म्हणजे इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन. सुरवात ह्या दृष्टीनें ही योजना स्वागतार्ह आहे.

खुल्या नाणेबाजारांत उद्योगधंद्यांना भांडवल मिळवून देणाऱ्या आणखी वेगळ्या स्वरूपाच्या संस्थांची जरूरी आहे. अिंग्लंड अमेरिकेंत ज्याप्रमाणे 'अिशुअिंग हौसेस' असतात—उदाहरणार्थ, मार्गन रॉथचाअिल्ड अित्यादि—तशा दलालाच्या संस्था निघावयास हव्यात. सध्यांच्या शेअर बाजारांतील दलाल हें कार्य करण्याच्या मार्गे नसून भावांत प्रत्यहीं पडत असणाऱ्या फेरफारांचा फायदा घेण्याच्या अथवा लोकांना तो मिळवून देण्याच्या मार्गे असतात. 'अिशुअिंग हौसेस' चें काम कंपन्यांचे कर्जरोखे खपविण्याचें मुख्यतः असावयास हवें. आपल्या देशांत ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर घेण्याकडे जास्त कल असून डिबेंचर्स घेण्याची प्रवृत्ति फारच कमी आहे. ही प्रवृत्ति निर्माण करण्यासाठी प्रचाराची जरूरी आहे असें वाटतें.

**औद्योगिक बँका**

नव्या संस्थांमध्यें औद्योगिक बँकांचा अंतर्भाव करावयास हवा. अलीकडील पंचवीस वर्षांत हिंदी बँकिंगची स्पृहणीय प्रगति झालेली आहे. विशेषतः १९४२-४५ हीं दोन वर्षें बँकिंगच्या वाढीच्या दृष्टीनें संस्मरणीय आहेत. पण या सर्व नव्या व जुन्या बँकांच्या धंद्याचें स्वरूप व्यापारी आहे. कारखानदारीला मदत करण्याच्या हेतूनें अेकहि मोठी बँक स्थापन झालेली नाहीं. टाटा अिंडस्ट्रिअल बँकेला पसारा मार्गे आवरावा लागला हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. वास्तविक आजचा काळ कारखानदारीच्या वाढीला विशेष अनुकूल आहे. मुख्यतः परदेशी चढाओढ आज होत नाहीं व पुढें झाली तर तिला पायबंद घालण्याचें राजकीय स्वातंत्र्य लाभलें आहे. ज्या बँकांमध्यें मोठाले उद्योगपति संचालक आहेत, त्यांना आपापल्या पुरती कर्जाची सोय करून घेतां येत असेल; पण पुढील काळांत लहान लहान उद्योगधंद्यांवर आपण मदार ठेवूं अिच्छितों त्यांची वाट काय? त्यांना भांडवल पुरवठा योग्य व्हावयाचा असेल तर तात्काळ लहान लहान शहरांतून औद्योगिक बँकांची सरकारी प्रोत्साहन व भांडवल घालून स्थापना व्हावयास पाहिजे. या क्षेत्रांत सहकारी तत्त्वाचा उपयोग शक्य तितका करून घेतल्यास भांडवलशाहीचे कित्येक दुष्परिणाम टाळतां येतील. जर्मनींत औद्योगिक बँका आपल्यातर्फे नव्या कंपन्यांना भांडवल देतांना आपल्या वतीनें नव्या कंपनीवर अेक संचालक नेमून घेतात. या पद्धतीचा अिकडे सर्रास उपयोग करून घेतला तर बँकांना कारखादारीला मदत करतांना वाटणारा साशंकपणा दूर करून घेतां येईल.

**रिझर्व्ह बँक**

रिझर्व्ह बँकेवर कायद्यानें शेतकी भांडवलाबद्दल कांहींशी जबाबदारी टाकण्यांत आली होती. तशीच जर कांहीं कारखानदारी भांडवलाबाबत टाकली असती तर सोन्याहून पिवळें झालें असतें. आतां रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयकरण करण्यांत येत आहे. तें करतांना लहान धंद्यांना मदत कशा प्रकारें करतां येअील आणि अितर औद्योगिक बँकांना योग्य मार्गदर्शन कसें होअील याचा विचार करण्याची जबाबदारी आमच्या विधिमंडळानें सरकारवर टाकली पाहिजे. सर मणिलाल नानावटी यांची रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक नफ्यांतून शेतकऱ्याला थोड्या प्रमाणांत भांडवल पुरवतां यावें अशी अेक योजना 'अवर रूरल प्रॉब्लेम' या पुस्तकांत आहे. जर बँकेचें राष्ट्रीयकरण झालें तर हा सर्व नफा आजवर जसा अंदाजपत्रकांत उत्पन्नांत सामील होअी तसाच होत राहील. याप्रमाणेंच सरकारची जी नफा देणारी रेल्वे, तार व पोष्ट यांसारखीं खातीं आहेत त्यांचा नफाहि मध्यवर्ती उत्पन्नांत सर्वस्वीं सामील होतो. जर हा नफा व्यापारी कारखानदारांच्या उद्योगामुळें बव्हंशी होतो तर त्यांतील कांहीं अंश पुनः त्यांच्याच मदतीला गेला पाहिजे.

**मॅनेजिंग अेजंट्स**

आजवर झालेल्या औद्योगिक प्रगतीला मॅनेजिंग अेजंट्सनीं भांडवलाचा चांगलाच हातभार लावलेला आहे हें सुविश्रुत आहे. आज देशांत सर्वांत श्रीमंत असलेला हाच वर्ग होय. चालू धंदे व नवे धंदे यांना लागणारें भांडवल त्यांना मिळत जाणाऱ्या मेहेनताना व नफ्याचा वाटा यांतून पुष्कळ अंशीं पुरविलें गेलें यांत शंका नाहीं. मॅनेजिंग अेजंट्सकडून भांडवलाचा पुरवठा व्हावा अशी अपेक्षा असेल तर ही पद्धति बंद करण्याचें कारण नाहीं. पर्यायानें मॅनेजिंग अेजंट्सची श्रीमंती कायम ठेवावयास हवी. ती राहीलहि. पण ज्यापेक्षा यापुढील काळांत औद्योगिक नफ्यांत मजूर वर्गाकडे नफ्याचा जास्त जास्त वाटा व मालकींत भागीदारी जाण्याचा सूर निघूं लागला आहे व प्रत्यक्ष या घटना घडत आहेत त्या अर्थी मॅनेजिंग अेजंट्सकडून भांडवल-पुरवठा पूर्ववत होत राहील अशी अपेक्षा करणें चुकीचें ठरेल. नफा विभागणींत मजूर वर्गाला जास्त वाटा मिळून त्याची कर भरण्याची शक्ति वाढली आणि त्यामुळें मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न वाढून त्यांतून औद्योगीकरणाला वर सांगितलेल्या मार्गांनीं मदत झाली तर गोष्ट निराळी. मग मॅनेजिंग अेजंट्स कफल्लक झाले तरी परवा नाहीं. पण अशा प्रकारें मजूर—कामकऱ्यांची शक्ति वाढणें आणि त्यामुळें सरकारचें करांच्या रूपानें उत्पन्न वाढणें ही कालावधीची गोष्ट असून त्यांत जर—तर फार आहेत. खाजगी भांडवल आणि प्रयत्न यांवर जोंपर्यंत आमच्या सरकाराचा कांहीं ना कांहीं विश्वास आहे तोंपर्यंत मॅनेजिंग अेजंट्सच्या डबोल्यांचा सदभिलास सरकारला सोडावयास हवा.

**गुंतवणूक**

वरील विवेचनांत भांडवलाकरितां लागणारा पैसा कसा गोळा होत राहील याचाच प्रामुख्यानें विचार केला आहे. वास्तविक निव्वळ पैसा म्हणजे कारखानदारीला लागणारें प्रत्यक्ष सामग्री वगैरे भांडवल नव्हे. त्या दृष्टीनें जनतेनें केलेली पैशाची बचत ही भांडवलांत गुंतवणूक सकृद्दर्शनी होत नाहीं. पैशाचें भांडवलांत म्हणजे यंत्रसामग्री, कच्चा माल वगैरेत रूपांतर होईल तेव्हांच बचतीची गुंतवणूक खरी झाली असें म्हणतां येईल. तेव्हां बचतीचें प्रत्यक्ष भांडवलांत रूपांतर कसें साधतां येईल, म्हणजे येथेंच यंत्रसामग्री कशी करतां येईल, हा पुढचा महत्त्वाचा विचार येतो. या कार्यास विशेषतः जपाननें वापरलेल्या मार्गाचा तांतडीनें अवलंब करावयास हवा. तो म्हणजे आपल्याकडील बुद्धिमान माणसें वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या व्यवसायांच्या शिक्षणाकरितां पाठविणें. दुसरा मार्ग असा कीं, ज्याअर्थी ब्रिटन आपलें कर्ज फेडूं शकत नाहीं त्या अर्थी कर्जांत मिळणाऱ्या सवलतींच्या पोटीं ब्रिटनकडून तांत्रिक वाकबगार माणसें, यंत्रसामग्री तयार करण्यास लागणारीं डिझाइन्स, आराखडे, नकाशे इत्यादिकांची आग्रहानें मागणी करणें. ब्रिटनला स्वतंत्र हिंदुस्थानचें सख्य ठेवावयाचें तर ही मागणी डावलून टाकणें त्याला कठीण जाईल.

सहकारी कानूंत दुरुस्ती

## नियमित जबाबदारीच्या सोसायटींनीं घ्यावयाच्या कर्जावर निर्बंध

मुंबई सहकारी कायद्याच्या ७१ व्या कलमानें दिलेल्या अधिकारान्वयें, मुंबई सरकार सहकारी कानूंपैकी ८ व्या कानूचे जागीं खालील नवे कानू घालूं इच्छित आहे. त्यास कोणाची हरकत वगैरे असल्यास १५ एप्रिलपर्यंत ती सरकारकडे पोंचली पाहिजे.

८. (१) नियमित जबाबदारीच्या कोणत्याहि सोसायटीनें (मुंबई प्रां. सहकारी बँक वगळून) रजिस्ट्रारच्या आगाऊ परवानगीशिवाय, आपलें वसूल भांडवल, रिझर्व्ह फंड आणि बिल्डिंग फंड ह्यांतून एकूण तोट्याची रकम वजा घालून जेवढी रकम होईल तिच्या आठपटींपेक्षा ज्यास्त देणें निर्माण करतां कामा नये.

(२) प्रांतिक सरकारच्या पूर्व संमतीशिवाय रजिस्ट्रार अशी परवानगी देणार नाहीं. कोणत्या अटी पार पडल्या असतांना अशी परवानगी देण्यास हरकत नाहीं, त्यांची यादी सरकार जरूर तर तयार करील.

(३) शेतकी खरेदी विक्री सोसायटी अथवा मल्टिपर्पज सोसायटी शेतमालाचे तारणावर कर्जें देण्यासाठी मध्यवर्ती रकम पुरविणाऱ्या संस्थेकडून कर्ज काढतें. अशा कर्जाची रकम त्या सोसायट्यांचें एकूण देणें ठरवितांना वजा घातली जाईल.

(४) जिल्हा सेंट्रल बँकेचें एकूण देणें ठरवितांना तिच्या एकूण देणें रकमेंतून, ती धारण करीत असलेल्या कांहीं मर्यादेपर्यंत सरकारी रोख्यांची दर्शनी किंमत वजा घातली जाईल. अर्थात्, त्या बँकेच्या वसूल शेअर भांडवलाच्या दुपट रकमेइतकेच रोखे वजा घालतां येतील आणि हे रोखे मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या ताब्यांत ठेवले पाहिजे. एखाद्या बँकेचा कारभार समाधानकारक आहे असें रजिस्ट्रारला वाटल्यास किंवा विशेष कारणासाठी, प्रांतिक बँकेच्या ताब्यांत रोखे ठेवण्याची अट तो सैल करूं शकेल.

### प्रांतिक बँकेचा ठेवी घेण्याचा अधिकार वाढला

८-अ प्रांतिक सहकारी बँकेनें, आपलें वसूल भांडवल व सर्व रिझर्व्ह (त्यांत रिझर्व्ह फंड, रिझर्व्ह फॉर मार्केटिंग अडव्हान्सेस, बिल्डिंग रिझर्व्ह, डिबेंचर्ससाठी सिंकिंग फंड, डिव्हिडंड ई. रिझर्व्ह, बुडीत कर्जफंड, थकलेलें व्याज फंड हे सर्व येतात) ह्यांच्या बेरजेंतून एकूण तोटा, प्रत्यक्ष बुडीत कर्जें व थकलेलें व्याज हीं वजा करून जेवढी रकम होईल तिच्या बारा पटींपर्यंत देणें निर्माण करण्यास हरकत नाहीं. ह्या मर्यादेबाहेर बँकेनें ठेवी घेतल्या, तर त्या मर्यादेबाहेरील ठेवींचा बँकेनें आपल्या रोजच्या व्यवहारांत उपयोग करतां कामा नये; सरकारी रोखे, सरकारी रोख्यांच्या तारणावरील कर्जें, मान्यता दिलेल्या बँकांकडे अल्प मुदतीच्या ठेवी, एवढ्यांतच ती जादा रकम गुंतवली पाहिजे.

---

### नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | रकम (रु.) | स्वरूप |
|---|---|---|
| महाराष्ट्र शुगर मिल्स लि., मुंबई | २०,००,००० | बोनस शेअर्स |
| केकर्स टाइपरायटर्स एक्सचेंज लि., दिल्ली | ५०,००,००० | नवी कं. |
| माझगांव डॉक लि., मुंबई | ४५,००,००० | भांडवलवाढ |
| सी लाइन स्टीम नॅ. कं. लि., मुंबई | २०,००,००० | नवी कं. |


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,५४,३५० रु. |
| भरलेलें भांडवल | ८८,००० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०७,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार

या बँकेमार्फत केले जातात.

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/- चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/- (रु. ५/- प्रिमीयम् म्हणून व रु. २०/- अर्जासोबतचे) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/- ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/- चा. एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यामधील अंतर ३ महिन्याचेपेक्षा कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## बँक ऑफ पूना लि.

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १२,५०,००० |

बँक चालू व सेव्हिंग्ज मुदतीच्या ठेवी स्वीकारते. चालू खात्यावर अर्धा टक्का, सेव्हिंग्जवर दीड टक्का, व एक वर्ष मुदतीच्या ठेवींवर अडीच टक्के व्याज दिलें जातें.

सेफ डिपॉझिट लॉकरची मुख्य कचेरींत सोय.

विशेष माहितीकरितां
समक्ष भेटा अगर लिहा.

सदाशिव पेठ शाखेची वेळ–सकाळीं ९ ते ११
सायंकाळीं ५ ते ७॥

मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें.

गो. गं. साठे
A. B. I. (London)
मॅनेजर.

## प्रांतिक सहकारी परिषद

### सर मदन, श्री. खेर व सर कृष्णमाचारी ह्यांचीं भाषणें

मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेचें ता. ११ रोजीं उद्घाटन करतांना मुंबई प्रांताचे पंत प्रधान श्री. खेर ह्यांनीं गेल्या वर्षांत ह्या प्रांतामध्यें मागसलेल्या आदिवासी लोकांसाठी स्थापन झालेल्या सहकारी सोसायट्यांचा उल्लेख केला आणि ठाणें, कुलाबा, नाशिक जिल्ह्यांतील लाकूडतोडे व कोळसे करणारे ह्यांची सहकारी संघटना करण्याचें सहकारी धोरण विशद केलें. गेल्या दोन वर्षांत ८५ नव्या गृहमंडळ्या नोंदण्यांत आल्या. सहकारी शेतीच्या प्रसाराचें अगत्य त्यांनीं प्रतिपादलें. पंत प्रधानांच्या भाषणाचे आधीं, इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जनार्दन मदन, ह्यांनीं गेल्या तीन वर्षांत सहकारी चळवळ कशी फोफावत आहे, ह्याची खालीलप्रमाणें आकडेवार माहिती दिली:–

| संस्था | १९४४ | १९४७ |
|---|---|---|
| सहकारी सोसायट्या | ६,१३३ | ८,००३ |
| त्यांचे सभासद | ९,०२,४४३ | १२,२९,०५० |
| खेळतें भांडवल (रु.) | २५ कोटी | ३९ कोटी |

रशियन पद्धतीच्या सामुदायिक शेतीचा प्रयोग हिंदुस्थानास मानवणार नाहीं, असें परिषदेचे अध्यक्ष, सर व्ही. टी. कृष्णमाचारी, ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. लोकांच्या रहाणीचा दर्जा सुधारण्याचे कामीं सहकारी संघटनेचाच उपयोग होण्याचें महत्त्व त्यांनीं पटवून दिलें.

---

### पांच व सात वर्षें मुदतीचीं नॅ. से. सर्टिफिकिटें केव्हांही मोडतां येतील

नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचे नवे दोन प्रकार सरकारनें विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे, ते १ जून १९४८ पासून मिळूं शकतील. सध्यां १२ वर्षें मुदतीचीं सर्टिफिकिटें आहेत, त्यांत ह्या ५ व ७ वर्षें मुदतीच्या सर्टिफिकेटांची भर पडत आहे. तीं अल्प मुदतीचीं असून केव्हांहि मोडतां येतील, हें त्यांचें मध्यमवर्गीयांस विशेष आकर्षण आहे. खालील तुलनात्मक तक्त्यांत तीनहि प्रकारच्या सर्टिफिकेटांची माहिती दिलेली आहे. त्या सर्वांवरील व्याज करमाफ असून सर्वांत मिळून १५,००० रु. गुंतविता येतात.

| सर्टिफिकेटाची किती रकम मिळेल. वर्षांनंतर | पांच वर्षांचीं सर्टिफिकिटें (रु.) | सात वर्षांचीं सर्टिफिकिटें (रु.) | बारा वर्षांचीं सर्टिफिकिटें (रु.) |
|---|---|---|---|
| १ | १०–० | १०– ० | — |
| २ | १०–४ | १०– ३ | १०–४ |
| ३ | १०–८ | १०– ७ | १०–८ |
| ४ | ११–० | १०–१४ | ११–० |
| ५ | ११–८ | ११– ६ | ११–८ |
| ६ | | १२– ० | १२–० |
| ७ | | १२– ८ | १२–८ |
| ८ | | | १३–० |
| ९ | | | १३–८ |
| १० | | | १४–० |
| ११ | | | १४–८ |
| १२ | | | १५–० |


# दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बॅंक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बॅंक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बॅंकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटींसाठीं चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

विश्वासानें व किफायतशीरपणानें भांडवल गुंतविण्याचें आदर्श ठिकाण

# पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड

हेड ऑफिस व फॅक्टरीः पोस्ट–कुरोली
(व्हाया–कुर्डुवाडी)

कंपनीचें खपलेलें शेअर-भांडवल रु. ४,३७,७००
वसूल शेअर भांडवल रु. ३,२६,५००
कंपनीकडील मुदतीच्या ठेवी रु. २,७०,४००

वाढत्या धंद्यासाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते

| | | | |
|---|---|---|---|
| ★ मुदत वर्षें | १, | २, | ३. |
| ★ व्याजाचा दर द. द. शेकडा | ४½, | ५, | ६. |

कंपनीनें पहिल्याच वर्षी १० टक्के (करमाफ) डिव्हिडंड दिलें आहे.

अधिक माहितीसाठीं आजच वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस्ः—जे. व्ही. ताम्हनकर आणि कं.

## विविध माहिती

**मळ्यांतील मजुरांच्या पगारांत वाढ**—दिल्ली येथें भरलेल्या चहाच्या व इतर मळ्यांसंबंधींच्या कमिटीचें कामकाज नुकतेंच संपलें. हिंदुस्थानांतील मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांची पगारवाढ करण्याचा निर्णय कमिटीनें घेतला आहे. ह्या निर्णयामुळें मजुरांना दरवर्षी ५ कोटी रुपये अधिक मिळतील. पगारवाढ १ मे १९४८ पासून मिळणार आहे.

**गर्भपातास कायदेशीर मंजुरी**—जपानच्या वरिष्ठ विधिमंडळांत लवकरच एक कायदा प्रविष्ट करण्यांत येणार आहे. ह्या कायद्यान्वयें जपानच्या इतिहासांत गर्भपातास प्रथमच कायद्याची मंजुरी मिळणार आहे.

**सक्तीच्या लष्कर भरतीस नीग्रोंचा विरोध**—अमेरिकेंत सक्तीची लष्कर भरती करण्याचें ठरल्यापासून तेथील नीग्रोंचा ह्या योजनेस सशर्त विरोध प्रकट होऊं लागला आहे. अमेरिकन लष्करांत नीग्रोंविषयीं जो भेदभाव करण्यांत येतो तो बंद करण्यांत आल्याशिवाय लाखो नीग्रो लोक सक्तीच्या लष्कर भरतींत नांवें नोंदविणार नाहींत, असें एका नीग्रो पुढाऱ्यानें अमेरिकन सिनेटच्या लष्करी–समितीपुढें सांगितलें.

**लग्नाच्या व घटस्फोटाच्या नोंदींची सक्ती**— सिंधमधील मुसलमानांतील लग्न व घटस्फोट ह्यांची नोंदणी सक्तीनें करण्याचें बिल सिंध सरकारनें तयार केलें आहे. इंडिअन पीनल कोडाच्या अन्वयें जे लग्नविषयक खटले कोर्टापुढें येतात त्यांत मुसलमान बेवारसी मुलांना व विधवांना अन्याय होतो. लग्नाची अगर घटस्फोटाची नोंदणी नसल्यामुळें त्यांना पुष्कळदा हक्काची मालमत्ता मिळत नाहीं. तें टाळण्यासाठीं वरील बिल तयार करण्यांत आलें आहे.

**हिंदुस्थानसाठीं रेल्वे एंजिनें** — ह्या वर्षी हिंदुस्थानांतील रेल्वेसाठीं ७१० अधिक एंजिनें मिळणार आहेत. वहातुकीच्या अडचणी लक्षांत घेऊन जुनीं रेल्वे एंजिनें दुरुस्त करून वापरणें, चालू एंजिनांना लागणारे सुटे भाग हिंदुस्थानांत तयार करणें आणि नवे आयात करणें असे उपाय योजण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्याशिवाय ह्या वर्ष अखेर अमेरिका व इंग्लंडकडून २१० नवीं एंजिनें मिळावयाचीं आहेत.

**पोस्टाच्या तिकिटावर गांधीजींचें चित्र**–गांधीजींचें चित्र असलेलीं चार वेगवेगळ्या किंमतीचीं पोस्टाचीं तिकिटें हिंदुस्थान सरकार लवकरच काढणार आहे असें समजतें. ह्यासाठीं देशी कलावंतांबरोबरच परदेशी कलावंतांचीही मदत घेण्यांत येणार आहे. बुद्धाची प्रतिमा असलेलीं तिकिटें काढण्याचा सरकारचा विचार नाहीं.


**चित्रपटासाठीं फिल्मचा कारखाना**—बोलपटासाठीं लागणाऱ्या कच्च्या फिल्म्स हिंदुस्थानांत तूर्त तयार होण्यासारख्या नाहींत. त्यासाठीं जरूर असणारीं रासायनिक द्रव्यें अजून परदेशांतून आणावीं लागतात. फिल्म्ससाठीं लागणारें 'जिलेटिओन' तर जगांत फारच थोड्या कंपन्या तयार करूं शकतात. एप्रिल ते जुलै १९४७ मध्यें हिंदुस्थानांत ३८ लाख रुपयांहून अधिक कच्च्या फिल्म्स आयात करण्यांत आल्या.

**तोतया पदवीधरांनों, सावधान!**—लंडन विद्यापीठाची पदवी अगर डिप्लोमा असल्याचें सांगून कित्येक लोक नौकरी मिळविण्याचा प्रयत्न करतात असें त्या विद्यापीठाच्या लक्षांत आलें आहे. नौकरी देणाऱ्यांनीं पदवी अगर डिप्लोमा पाहून आणि विद्यापीठाकडे चौकशी करूनच नौकऱ्या द्याव्या, अशी सूचना विद्यापीठातर्फे करण्यांत आली आहे.


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## कानूमधील दुरुस्ती—मध्यवर्ती बँकांचा दृष्टिकोन

( ले. :—एका बँकेचा संचालक )

सहकारी कानूंत मुंबई सरकार दुरुस्ती करणार आहे, त्यांतील ८ व्या कानूमध्यें नियमित जबाबदारीच्या संस्थेनें आपल्या स्वतःच्या एकूण भांडवलाच्या किती पट ठेवी स्वीकाराव्यात ह्या-संबंधी योजना आहे. युद्धकालीन परिस्थितीमुळें व चलनवृद्धी-मुळें सहकारी संस्थांच्या ठेवींमध्यें भरमसाट वाढ झाली व मूळ कानूच्या मर्यादेबाहेर ठेवी स्वीकारल्या गेल्या. ही परिस्थिति व प्रवृत्ति लक्षांत घेऊन कांहीं विशिष्ट अटींवर जादा ठेवी स्वीकारण्याचा अधिकार सहकारी संस्थांना सरकारनें दिला. प्रस्तुत कानूमध्यें जी दुरुस्ती सुचविली आहे तीमुळें प्रांतिक बँक व जिल्हा बँका ह्यांचिमध्यें फरक करण्यांत आला आहे. प्रांतिक बँकेच्या ठेवींची मर्यादा ठरवितांना तिनें निरनिराळ्या कारणांसाठी काढलेले वेगवेगळे फंड विचारांत घेतले जावयाचे आहेत; परंतु जिल्हा बँकांना ही व्यापक सवलत दिलेली नाहीं. वास्तविक ठेवी स्वीकारण्याच्या मर्यादेचे बाबतींत एकच तत्त्व सर्व बँकांना लावणें योग्य होईल. प्रांतिक बँकेप्रमाणें जिल्हा बँकांकडेही ज्यास्त ठेवी येण्याची शक्यता आहे. जिल्हा बँकांनीं जादा ठेवी स्वीकारतांना रजिस्ट्रारची परवानगी मागण्याऐवजी सर्वसाधारण धोरणानें हा अधिकार बँकांना असावा व ज्या बँकांनीं अशा ठेवी स्वीकारणें रजिस्ट्रारला अनिष्ट वाटेल, अशांना त्या स्वीकारण्याची बंदी करावी. संस्था व जनता ह्यांचा शक्य तेवढा पैसा सहकारी क्षेत्रांत यावयाचा असेल तर त्याबाबत लवचीकपणा पाहिजे.

---

### दि बँक ऑफ औंध लि., औंध

( वार्षिक सभा: १६ मे, १९४८ )

वरील बँकेचें ३,२३,४२० रुपयांचें भांडवल खपलेलें असून त्याच्या निम्मी रक्कम मागणी केलेली आहे. ती सर्व वसूल झालेली आहे. वेगवेगळ्या फंडांत मिळून ८३ हजार रुपये आहेत. ठेवींची रक्कम १४ लक्ष रु. आहे. अशा रीतीनें, खेळतें भांडवल १६३/४ लक्ष रुपयांचें आहे. अहवालाचे वर्षी एकंदर ठेवींत ३ लाखांची घट झाली आणि तितक्याच रकमेनें खेळतें भांडवल कमी झालें आहे. बँकिंगच्या धंद्यांतील सर्वसाधारण प्रवृत्तीस हें धरूनच आहे. बँकेनें २ लक्ष, १५ हजार रुपये रोख व इतर बँकांत चालू खात्यावर ठेवले असून ४ लक्ष, ८७ हजार रुपये भागांत, सहकारी रोख्यांत व नॅ. से. सर्टिफिकिटांत गुंतविले आहेत. बाजार भावानें वरील भागांची व रोख्यांची किंमत ३ हजार रुपयांनीं ज्यास्तच भरत आहे. बँकेनें ९१/२ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. बँकेनें १६,९२५ रु. व्याज दिलें व ६३,७९८ रु. व्याज मिळविलें. कमिशन व हुंडणावळ ह्यांचेंहि उत्पन्न ( १३,१५१ रु. ) चांगलें झालें आहे. निव्वळ नफा २०,५३४ रु. उरला. भागीदारांना ५% डिव्हिडंड देण्यास ७,९५१ रु. टाफतील आणि नोकरांना ३,२९१ रु. बोनस देण्यांत येईल. रिझर्व्ह फंडांत ४,०१० रुपयांची भर पडणार आहे. पुण्याचे पेपर मर्चंट श्री. माधवराव जोशी हे बँकेचे चेअरमन असून श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस औंध येथें असून हेड ऑफिस सातारा येथें आहे. वार्षिक सभा औंध येथेंच भरणार आहे.

### ओगले ग्लास वर्क्स, लि.

( वार्षिक सभा: २५–४–४८ )

१९४७ सालीं वरील कंपनीनें २६ लक्ष, ७६ हजार रुपयांची विक्री करून ८,१५,८१३ रु. अव्वल नफा मिळविला. त्यांतून सर्व खर्च, घसारा, मॅनेजिंग एजन्सी कमिशन इत्यादि वजा जातां निव्वळ नफा ३,०९,१८० रु. उरतो. भागीदारांना इंटेरिम ८% व फायनल ६% मिळून वर्षाचे एकूण १४% डिव्हिडंड मिळत आहे. नोकरांस बोनस देण्यासाठी १,३०,००० रु.ची तजवीज केलेली आहे.

काच कारखान्यास जरूर असलेला दगडी कोळसा, सोडा वगैरे महत्त्वाचा कच्चा माल मिळण्याची अडचणीची परिस्थिति अद्याप चालू असल्यानें काचकारखान्याची उत्पादन क्षमता पूर्णपणें उपयोगांत आणणें कठीण झालें आहे. कामगार वर्गानें सहकार्याचें धोरण राखून आपआपलीं कामें तत्परतेनें केलीं, असा उल्लेख रिपोर्टांत करण्यांत आला आहे.

महात्माजींच्या दुःखद निधनानंतर महाराष्ट्रांत प्रक्षोभाची लाट उसळली, त्यावेळीं कारखान्यांतील कामगार वर्ग व आजूबाजूचे पुढारी ह्यांनीं कारखान्याचे परिसरांत शांतता ठेवण्यास चालकांस मदत केली, त्याबद्दल डायरेक्टरांनीं त्यांचे आभार मानले आहेत. कारखान्याचे जागेंत महात्माजींचें एक स्मारक उभारण्याचें ठरलें आहे, त्यास मॅनेजिंग एजंटांनीं ५ हजार रु. ची मदत देऊं केली आहे.

---

### टाकळी ता. ( पंढरपूर ) श्री लक्ष्मीदेवी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी

या सोसायटीची जनरल सभा ता. २८-३-४८ रोजीं श्री. एस्. बी. देशपांडे, मद्रूर, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस सुमारें १००।१५० शेतकरी समुदाय जमला होता. प्रथम मे. साळुंके, बँक इन्स्पेक्टर पंढरपूर, यांनीं सोसायटीचे सभासदांनीं काटकसर कशी करावी व बचत योजनेनुसार सोसायटीमध्यें कां ठेवी ठेवाव्यांत व अशा ठेवी सोसायटींत ठेवल्यामुळें पुढील येणाऱ्या मंदीच्या काळांत या ठेवींचा कसा उपयोग करून घेतां येईल व त्यामुळें सोसायटीचें व सभासदाचें कसें संरक्षण होईल व आणखी कसकसे फायदे घेतां येतील हें विशद करून सांगितलें. नंतर सोसायटीचे प्रत्येक सभासदानें रु. २० बचत योजनेनुसार सोसायटीमध्यें ठेव म्हणून ठेवण्याचें एकमतानें ठरलें. नंतर अध्यक्षांनीं समारोपादाखल भाषण केलें. नंतर आभारप्रदर्शन होऊन सभा बरखास्त झाली.


## पोवाडे गाण्याकरितां पगारी प्रचारक पाहिजेत

पू. खा. जिल्हा दारुबंदी समितीतर्फे पूर्व खानदेश जिल्ह्यामध्यें पोवाडे गाण्याकरितां पगारी प्रचारक नेमावयाचे आहेत. तरी शाहीरांनीं खालील पत्त्यावर आपल्या अटींसह ता. २५–४–४८ च्या आंत अर्ज करावेत.

म. ना. सावंत.
जिल्हा दारुबंदी अधिकारी,
पूर्व खानदेश.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
ग. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.